## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. १**

जळगाव दि. १ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत पुलवामा येथील हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रध्दांजली अर्पण करण्यात येवून दहशतवादाला चोख प्रत्युत्तर दिल्याबद्दल सेनादलाचे अभिनंदन करणारा ठराव मान्य करण्यात आला.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि.१ मार्च रोजी व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. आजच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. बैठकीच्या प्रारंभी प्रा.जितेंद्र नाईक यांनी दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रध्दांजली अर्पण करणारा ठराव मांडला. सर्व सदस्यांनी शहीद जवानांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली. या दहशतवादाला चोख प्रत्युत्तर दिल्याबद्दल तीनही सेनादलाच्या अभिनंदनाचा ठराव दिलीप पाटील यांनी मांडला. सभागृहाने हा ठराव मान्य केला. या बैठकीत नवीन व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.ए.बी.चौधरी यांचे कुलगुरुंच्या हस्ते स्वागत करण्यात आले तर प्रा.एस.टी.इंगळे यांच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांना सभागृहाने निरोप दिला. प्रा.इंगळे यांनी या बैठकीत आपल्या भावना व्यक्त करताना सभागृहात नवीन बरेच काही शिकता आले व सर्वांचे सहकार्य मिळाले असे सांगितले. परीक्षा विभागाने विविध क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या १४३ विद्यार्थ्यांची स्वतंत्रपणे परीक्षा घेतल्याबद्दल परीक्षा विभाग आणि क्रीडा मंडळाचे अभिनंदन करणारा ठराव विवेक लोहार यांनी मांडला. शेवटी कुलसचिव भ.भा.पाटील यांनी आभार मानले.

---

**बातमी क्र. २**

जळगाव दि.१ ( ) राष्ट्रीय गणित दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणित विभागाच्या वतीने रविवार दि. ३ मार्च रोजी शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या गणित विभागात रविवारी गणित शिक्षक व संशोधक विद्यार्थी यांच्यासाठी कार्यशाळा घेण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यशाळेत प्रा.पंकज माथुर (लखनौ), प्रा.गणेश केदार (नागपूर) हे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच यावेळी प्रश्नमंजुषा आणि पोस्टर सादरीकरण होणार आहे.

राष्ट्रीय गणित दिनाच्या निमित्ताने शिंदखेडा येथील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ.अरुणकुमार पाटील, संदेश सोनोणे, प्रफुल्लकुमार शिसोदे, अशोक पाटील, प्राचार्य बी.आर.चौधरी, प्रा.एस.आर.चौधरी यांचे व्याख्यान झाले. तसेच बोदवड येथील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्रा.एस.डी.कटोरे (अमरावती) यांचे व्याख्यान झाले.गुरुवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी दहावी तसेच बी.एस्सी. (तृतीय) आणि एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांसाठी उद्दिष्ट चाचणी स्पर्धा घेण्यात आली.

....२...

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.१ ( ) जनसंपर्क, जाहिरात, एफ.एम.रेडिओ आणि वृत्तपत्र क्षेत्रातील प्रत्यक्ष कार्यपध्दती, तेथील नवे तंत्रज्ञान तसेच या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन विदयार्थ्यांना मिळावे, यासाठी जनसंवाद आणि पत्रकारितेच्या विदयार्थ्यांचा अभ्यास दौरा जळगाव शहरात आयोजित करण्यात आला होता.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातील एम.ए.एम.सी.जे. द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा स्थानिक अभ्यास दौरा मंगळवार दि.२६ फेबुवारी २०१९ रोजी जळगाव शहरातील जिल्हा माहिती कार्यालय, माय.एफ.एम. ९४.३ आणि दैनिक लोकमत एम.आय.डी.सी. कार्यालय, जळगाव येथे डॉ.सुधीर भटकर व डॉ.विनोद निताळे यांच्या मार्गदर्शनात आयोजीत करण्यात आला होता.

या अभ्यास दौऱ्यात विदयार्थ्यांनी जिल्हा माहिती कार्यालयाला प्रथम भेट देवून तेथील कार्यपध्दती जाणून घेतली. या प्रसंगी जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके यांनी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर विदयार्थ्यांनी शहरातील ९४.३ माय एफ.एम. या रेडिओ केंद्राला भेट देवून एफ.एम.रेडिओची कार्यपध्दती आणि या क्षेत्रातील करिअरच्या नवीन संधी याविषयी आर.जे.तेजस्विनी, आर.जे.देवा, आर.जे.हरिता यांच्या कडून माहिती जाणून घेतली. दुपारच्या सत्रात विदयार्थ्यांनी दैनिक लोकमतच्या एम.आय.डी.सी. कार्यालयाला भेट देवून कार्यपध्दती जाणून घेतली. वृत्तपत्र निर्मितीची प्रक्रिया, बातमी लेखन, संपादन या विषयी वरिष्ठ उपसंपादक रवींद्र मोराणकर व उपसंपादक विजय सैतवाल यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुद्रण तंत्रज्ञानाविषयी तारांचद पाटील व अरूण पाटील यांनी विदयार्थ्यांना प्रात्याक्षिकासह माहिती दिली.

-----------------------------------------------------------------------------------------------------

**बातमी क्र. ४**

जळगाव दि. ०१ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळातंर्गत बौध्द अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने मंगळवार, दि.५ मार्च, २०१९ रोजी कॉन्शिअसनेस इन बुध्दीझम या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात या परिषदेचे उद्‌घाटन होणार आहे, अशी माहिती प्रशाळेचे संचालक प्रा.अनिल डोंगरे यांनी दिली.

-----------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : १ मार्च, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी